रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

**शिष्यवृत्ती नोटीस २०२३-२०२४** दि.३१/१०/२०२३

**बी.कॉम./ एम.कॉम. /बीबीए ( सीए )**

**एस.सी./ एस.टी./ ओ.बी.सी./ एन.टी./एस.बी.सी./ अपंग विद्यार्थी /ओपन कॅटेगिरी**

**महाडीबीटी वेबसाईटवर शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना**

सन २०२३-२४ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, **Handicap, SC, ST, OBC, SBC, NT all, Open, EWS, Paying** या कॅटेगिरीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी खालील प्रमाणे पूर्तता करुन शिष्यवृत्ती अर्ज भरावा. **ऑनलाईन फॉर्म भरताना फक्त ओरीजनलच कागदपत्र अपलोड करावे. झेरॉक्स अपलोड करु नये.** झेरॉक्स अपलोड केले तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यार्थी लॉगीनला परत पाठविले जातील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. बी.कॉम. व एम.कॉम. मधील विद्यार्थ्यांनी ज्या कॅटेगिरीत प्रवेश घेतलेला आहे त्या कॅटेगिरीचा शिष्यवृत्ती अर्ज भरणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे. **प्रवेश घेतलेल्या कॅटेगिरीचा शिष्यवृत्ती अर्ज संबंधीत विद्यार्थ्यांनी भरला नाही तर अशा विद्यार्थ्यांना पेईंन फी प्रमाणे फी भरावी लागेल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

बीबीए सीए वर्गातील एस.सी.,एस.टी.,व अपंग व अल्पसंख्यांक कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांनीच शिष्यवृत्ती अर्ज भरुन जमा करावा. विद्यार्थ्यांस ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण आल्यास शिष्यवृत्ती विभागातून माहिती घ्यावी. **तसेच ऑनलाईन अर्ज भरल्यावर अर्जाचा ID & Passward लिहून आणावा तसेच स्वत: जवळ जपून ठेवावा.**

| | |
|---|---|
| १. | विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बँक खात्याला लिंक नसल्यास ऑनलाईन कोणताही शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:चे आधारकार्ड बँक खात्याला लिंक आहे की नाही हे पुढील प्रमाणे दिलेल्या माहिती प्रमाणे चेक करावे **https://uidai.gov.in/ My Aadhar / Aadhar Services / Bank Seeding Status / Login / Enter Aadhar / Enter Captcha / Send OTP / Login / Check Bank Seeding Status** |
| २. | **विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते नसल्यास विद्यार्थ्यांनी शक्य असल्यास फक्त बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेतच खाते उघडावे.** किंवा **पोस्ट ऑफीसमध्येच खाते उघडावे. विद्यार्थ्यांचे** अगोदर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्यास आधार कार्डच्या वेबसाईडवर आधार कार्ड बँक खात्याला लिंक असल्याची खात्री करुन घ्यावी. विद्यार्थ्यांचे बँक खाते **NPCI** पोर्टलला लिंक नसल्यास शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही. **बँक खाते NPCI ला लिंक नसल्यास बँकेत जाऊन खाते लिंक करुन घ्यावे व बँकेकडून खाते NPCI** पोर्टलला **लिंक होत नसल्यास लगेच जवळच्या कोणत्याही पोस्ट ऑफीसमध्ये जाऊन बँक खाते उघडून घ्यावे.** |
| ३. | विद्यार्थ्यांनी स्वत:चे आधारकार्ड चालू असल्याची आधारच्या वेबसाईडवरुन खात्री करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याजवळ स्वत:चे आधारकार्ड व डोमासाईल सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. सदर आधारकार्डला स्वत:चा मोबाईल नंबर व ईमेल आय.डी.लिंक करुन घ्यावे. तसेच सदर आधारकार्ड व मोबाईल नंबर स्वत:च्या बँक खात्याला लिंक असणे अनिवार्य आहे. **या शिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती व शासनाने ठरवून दिलेल्या कोणत्याही योजनेचा ऑनलाईन अर्ज भरता येणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** तसेच आधार कार्ड वरील स्वत:चे नाव व जन्म तारीख बरोबर असल्याची खात्री शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्या अगोदर करुन घ्यावी. |
| ४. | १० वी नंतरचा डिप्लोमा किंवा अन्य व्यावसायिक कोर्स पूर्ण किंवा अर्धवट करुन आलेला असल्यास सदर विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप मिळणार नाही. तरी अशा संबंधीत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती विभागातून समक्ष येऊन माहिती घेणे. |
| ५. | विद्यार्थ्यांकडे रेशनकार्ड व रेशनकार्डमध्ये नाव असणे आवश्यक आहे. **परंतु ज्या विद्यार्थ्यांकडे रेशनकार्ड नाही किंवा रेशनकार्डमध्ये नाव नाही अशा विद्यार्थ्यांनादेखील शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरुन महाविद्यालयात जमा करावा.** |
| ६. | **आणि खालील प्रमाणे कागदपत्रे शिष्यवृत्ती अर्जाला जोडून जमा करावा.** १. डोमासाईल सर्टिफिकेट (२) रेशन कार्ड (३) अल्प कुटुंबाबतचे प्रमाणपत्र (महाडीबीटी वेबसाईटवर दिलेले-साध्या कागदावर देणे) (४) या महाविद्यालयातील तसेच बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचा तसेच संबंधीत महाविद्यालयाच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. (५) आधारकार्ड (६) आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असलेला फॉर्म बँकेच्या सही शिक्क्यासह. (७) जातीचा दाखला. (८) सन २०२३-२४ ची प्रवेश पावती.(ओरिजनल प्रवेश पावती महाविद्यालयाकडून मिळविणे) (९) **वडीलांचा सन २०२२-२३ चा उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला ओरिजनल जोडावा.** (१०) वडील हयात नसल्यास आईच्या नावाचा उत्पन्नाचा दाखला जोडून वडीलांचा मृत्युचा दाखला जोडणे अनिवार्य आहे. तसेच आई-वडील विभक्त राहत असल्यास कोर्टाचे कागदपत्र आवश्यक किंवा कोर्टाचे कागदपत्र नसल्यास साध्या कागदावर एफेडेव्हीट करुन हमीपत्र द्यावे. (११) ओ.बी.सी./एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १.५० लाख ते ८ लाखांपर्यंत असेल अशा विद्यार्थ्यांना आपल्या फ्रि-शिप अर्जाबरोबर स्वत:चा **नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.**(१२) दहावी व त्यापुढील (**पास,नापास, एटीकेटीसह** ) सर्व गुणपत्रक जोडणे. (१३) शैक्षणिक गॅप असल्यास साध्या कागदावर गॅप सर्टीफिकेट एफेडेव्हीट करुन द्यावे लागेल. (१४) बँक पासबुक |
| ७. | ओ.बी.सी./ एन.टी./एस.बी.सी. व ओपन कॅटेगिरीतील **अनुदानित (Grant) तुकडीतील** ज्या विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक असतील व त्यांचे उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने **STW** किंवा **PTW** सवलतीचा अर्ज भरुन द्यावा. |
| ८. | **अपंग विद्यार्थ्यांनी देखील अपंग शिष्यवृत्तीचा अर्ज ऑनलाईन भरुन सर्व कागदपत्रांबरोबर अपंगत्वाचा दाखला जोडून वेळापत्रकाप्रमाणे जमा करावा.** |
| ९. | विद्यार्थी शासकीय वसतिगृहात राहत असल्यास शिष्यवृत्ती अर्जात शासकीय वसतिगृहाची सर्व माहिती भरणे अनिवार्य आहे त्याशिवाय शिष्यवृत्ती अर्ज स्वीकारले जाणार नाही. तसेच शासकीय वसतिगृहाचे पत्र शिष्यवृत्ती अर्जाला जोडून द्यावे. |
| १०. | तसेच महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृहाची माहिती भरणे ऐच्छिक असेल. माहिती भरल्यास वसतिगृहाची पूर्ण फी भरल्याची पावती ऑनलाईन अपलोड करुन शिष्यवृत्ती अर्जाला जोडून द्यावी. |
| ११. | बी.कॉम. व एम.कॉम. मधील ओपन कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेचा अर्ज भरुन जमा करावा. |